# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 26.04.2024** **वार: शुक्रवार**

---

**मतदान जनजागृती**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेनं आज एका उपक्रमाचं आयोजन केलं होतं. प्रत्येक सोसायटीच्या अध्यक्षांनी सोसायटीत राहणाऱ्या सर्व सभासदांना भेटून मतदान करण्याबाबत माहिती द्यावी. तसंच मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचं आयोजन करावं असं आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी बोलताना केलं.

**विद्यार्थ्यांचे आवाहन**

'आम्ही मतदान करू शकत नाही; पण आमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तुम्ही नक्की मतदान करा' अशी विनंती आज पुण्यातील न्यू इंग्लिश मिडिअम शाळेतील विद्यार्थ्यांनी पालकांसह पुणेकरांना केली. सामाजिक बांधिलकी जपत साईनाथ मंडळ ट्रस्ट, श्री शिवाजी मित्र मंडळ आणि न्यू इंग्लिश मिडिअम शाळेतील प्राथमिक आणि माध्यमिक वर्गातील सुमारे चारशे विद्यार्थ्यांनी मतदानाचे आवाहन करीत जनजागृती केली.

तर एरंडवणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्वे रस्ता यांच्या वतीनं आज आबासाहेब गरवारे महाविद्यालयासमोर नव मतदारांमध्ये " माझे पहिले मत संविधानासाठी, लोकशाहीच्या रक्षणासाठी" या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

**एमआयएम उमेदवारी**

पुणे लोकसभा मतदारसंघातील एमआयएम चे उमेदवार अनिस सुंडके यांनी काल आपला उमेदवारी अर्ज भरला. आता पुण्यात महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर, महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे, आणि एमआयएम चे उमेदवार अनिस सुंडके यांच्यात लढत होणार आहे.

**प्रचार सभांमुळे कोंडी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांच्या प्रचार सभा आणि उमेदवारांच्या पदयात्रा, रोड शो मुळे शहराच्या अनेक भागात वाहतुकीची प्रचंड मोठी कोंडी होत असल्याचं चित्र दिसून येत आहे. आगामी काही दिवस विविध राजकीय पक्षांचे ज्येष्ठ नेते प्रचारासाठी पुण्यात येत असल्यानं वाहतूक पोलिसांवरील ताण आणखी वाढणार आहे.

**कोविड लस**

पिंपरी महापालिकेकडून शहरात आठ केंद्रांवर पुढील महिनाभराच्या कालावधीत कोविड प्रतिबंधक इन्कोव्हॅक लसीचा डोस दिला जाणार आहे, अशी माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोफणे यांनी आज दिली. सध्या प्रत्येक केंद्रावर दररोज २० डोस असं नियोजन करण्यात आलं आहे. उपलब्ध लसीच्या साठयानुसार वय वर्ष १८ आणि त्यापुढील वयोगटातील नागरिकांना इन्कोव्हॅक लसीची प्रतिबंधक मात्रा दिली जाणार असून दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल अशी माहिती आरोग्य विभागानं दिली आहे.

**<u>आपत्कालीन कार्यकेंद्र</u>**

पुणे शहरात पावसाळ्यापूर्वी करावयाची आपत्कालीन कामं आणि आपत्ती व्यवस्थापन याकरिता आपत्कालीन कार्यकेंद्र स्थापन करणे आवश्यक आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्कालीन केंद्र आणि पूर नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी महापालिका प्रशासनाला आज दिले.

**<u>नदी प्रदूषण</u>**

थेरगाव आणि किवळे या भागांतून दररोज वाहनांमधून नदीच्या कडेला राडारोडा टाकणाऱ्या वाहन चालकांवर आज महापालिका प्रशासनाने कारवाई केली. या संदर्भातील तक्रार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागास प्राप्त झाली होती त्यावर पर्यावरण विभागानं प्रत्यक्ष पाहणी ही कायदेशीर कारवाई केली. या कारवाईमध्ये १ लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे.

**<u>बौद्धिक संपदा</u>**

पेटंटसारख्या बौद्धिक संपदा या संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत पूरक आहेत, त्याचा फायदा जगभरातील देशांनी घ्यावा, असं मत स्वामित्व हक्क तज्ज्ञ प्राध्यापक गणेश हिंगमिरे यांनी व्यक्त केलं.
डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या डीईएस पुणे विद्यापीठाच्या वतीनं बौद्धिक संपदा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>पाणी टंचाई</u>**

पुण्यातील तीव्र पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर विविध खासगी संस्थांचा सहभाग असलेल्या तज्ज्ञांच्या गटानं प्रोजेक्ट जल मूल्य नावानं पुण्यासाठी उपलब्ध असलेलं पाणी, त्याचं वितरण आणि पुणेकरांकडून होणारा दैनंदिन पाण्याचा वापर याचा विस्तृत अभ्यास करुन अहवाल तयार केला आहे. या अभ्यास गटात पुणे आंतरराष्ट्रीय केंद्र , गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था त्याचबरोबर पुणे ज्ञान केंद्र या संघटनांचा सहभाग होता. भविष्यात पुण्याचा होणारा आर्थिक विकास, त्यातून वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता उपलब्ध पाण्याचं योग्य नियोजन करण्यासाठी सक्षम यंत्रणा तयार करण्याची गरज असल्याचा निष्कर्ष या अभ्यास गटानं काढला आहे.

**<u>भरत नाट्य</u>**

भरत नाट्य संशोधन मंदिराच्या पहिल्या बाला नाट्य महोत्सवाला आजपासून सुरुवात झाली. जेष्ठ रंगकर्मी शुभांगी दामले यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं. 28 एप्रिलला या महोत्सवाची सांगता होईल.

**<u>डॉक्टर बुधाजीराव मुळीक</u>**

ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ  डॉक्टर बुधाजीराव मुळीक यांना कृषी अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनिय योगदानाबद्दल एशियन असोसिएशन फॉर ॲग्रिकल्चर  इंजिनिअरिंगचा पुरस्कार जाहीर झाला आहे. बॅंकॉक इथं २३ मे रोजी होणा-या आंतरराष्ट्रीय कृषी अभियांत्रिकी परिषदेमध्ये पुरस्कार वितरण होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उष्णतेचा पारा आज पुन्हा  40 अंश सेल्सियसपर्यन्त पोहोचला तर किमान तापमान 23 पूर्णांक 40 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.